जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2025
तरुण भारत

# एकात्म मानव दर्शनात समग्र अभ्युदयाचा विचार

- राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानाचे उद्घाटन करताना डॉ. विनय सहस्त्रबुद्धे. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राजाराम गुरव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या 'एकात्म मानवदर्शना'मध्ये मानवाच्या समग्र अभ्युदयाचा विचार आहे. शरीर, बुद्धी, मन आणि आत्मा या सर्वांचा विचार केला आहे. या सर्वांच्या केंद्रस्थानी माणूस आहे, असे प्रतिपादन राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शन हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. 'एकात्म मानवदर्शन' हा व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले, भांडवलापेक्षा माणसाच्या आर्थिक गरजांना प्राधान्य देणारी साम्यवादी व्यवस्था मानवाच्या हिताची आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांचे भान त्यात आहे. समाजाप्रती कर्तव्य पार पाडण्याचा आग्रहही त्यामध्ये आहे. जगा आणि जगू द्या तसेच साहचर्य हे मानवकल्याणाचे भारतीय चिंतन आहे. भारताची विविधता हे त्याचे सौंदर्य आणि ताकद आहे. ही विविधता विघटनाचे कारण न बनता एकात्मतेचे बळ बनली पाहिजे. त्या विविधतेला सामाजिक न्याय आणि स्त्री-पुरूष समानतेच्या सूत्रात गुंफले पाहिजे. प्राचीन विज्ञान व परंपरा पुढे नेत असताना या विचारांची मांडणी योग्य पद्धतीने करता आली पाहिजे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, एकात्म मानवदर्शन या व्यापक संकल्पनेविषयी अनभिज्ञता आहे. त्या संदर्भातील योग्य प्रशिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन व्याख्यानाची एक महिन्यात पुस्तिका तयार करण्यात येईल. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या अध्यक्षपदाच्या कालखंडात विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांशी त्यांनी साधलेला संवाद अविस्मरणीय स्वरुपाचा होता.

डॉ. राजाराम गुरव यांनी स्वागत, केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुखदेव उंदरे, सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, संजय परमणे, मनोज पाटील, विनिता तेलंग, रतन कांबळे आदी उपस्थित होते.

14 AUG 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकात्म मानवदर्शनामध्ये मानवी जीवनाच्या उन्नतीचा विचार : डॉ. सहस्त्रबुद्धे



डॉ. सहस्त्रबुद्धे

कोल्हापूर, ता. १३ : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शनामध्ये मानवी जीवनाच्या उन्नतीचा सर्वांगीण विचार आहे, असे मत माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'एकात्म मानवदर्शन' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

एकात्म मानवदर्शन या व्यापक संकल्पनेविषयी अनभिज्ञता आहे. त्यासंदर्भातील योग्य प्रशिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन सदर व्याख्यानाची एक महिन्याच्या आत पुस्तिका तयार करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन विभागाचे डॉ. रामचंद्र पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुखदेव उंदरे, व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, संजय परमणे, मनोज पाटील, विनिता तेलंग, रतन कांबळे आदी उपस्थित होते. डॉ. राजाराम गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2025
तरुण भारत

# राजवर्धन पाटील कलर्स अॅवॉर्डने सन्मानित




**निटवडे : येथील राजवर्धन पाटील यास कलर्स अवार्ड प्रदान प्रसंगी कुलगुरू डॉ . डी टी शिर्के व मान्यवर.**

वार्ताहर
वडणगे

करवीर तालुक्यातील निटवडे येथील राजवर्धन सुरेश पाटील यांना छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कलर्स अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते हा कलर्स अवॉर्ड देण्यात आला.

मल्लखांब या खेळामध्ये ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल स्तरावर शिवाजी विद्यापीठाचे नेतृत्व करत सांघिक सुवर्ण पदक पटकावले त्याचबरोबर खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स या स्पर्धेत सहभाग नोंदवला. यापूर्वीही राजवर्धनने मल्लखांबमध्ये अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले. त्याच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाचा 'कलर्स अॅवॉर्ड' जाहीर झाला. कलर्स अवॉर्ड २०२३–२४ हा समारंभ विद्यापीठात पार पडला. या समारंभास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के , प्रा. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रिडा विभाग प्रमुख डॉ. एस. व्हि. बनसोडे आणि विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते.

त्याच्या या वाटचालीमध्ये क्रीडा शिक्षक तुषार पवार, विशाल पाटील , विश्वास चोपडे त्याचबरोबर के. आय. टी. कॉलेजचे क्रीडा प्रमुख विजय रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2025

पुण्यनगरी

# प्रा. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत दोन वर्षांतून एकदा देण्यात येणारा प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला. ५१ हजार रुपये, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. दि. २० ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. या पुरस्कारासाठी शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनने शिवाजी विद्यापीठाकडे एकत्रित निधी सुपूर्द केला आहे. पुरस्कार शोध समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे असून, समितीमध्ये डॉ. महादेव देशमुख, प्रा. जे. ए. यादव, डॉ. विजय ककडे आणि डॉ. राहुल शं. म्होपरे यांचा समावेश आहे. या समारंभाचे आयोजन शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर यांनी संयुक्तरीत्या केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 4 AUG 2025
तरुण भारत

# तरुणांनी स्वप्नांना प्रयत्नाची जोड द्यावी

**▪ डॉ. कृष्णा पाटील यांचे मत**

**कोल्हापूर :** आजच्या तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी स्वप्नांना प्रयत्नांची व कृतीची जोड दिली पाहिजे, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. गणित, एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) तसेच एम.कॉम., एम.एस्सी. गणित, एम.बी.ए. (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. हा कार्यक्रम जागतिक युवा दिनानिमित्त आयोजित केला होता. 'ज्ञान, कौशल्य आणि जबाबदारी : नवयुगातील युवकांची ओळख" हा या कार्यक्रमाचा विषय होता. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते. डॉ. पाटील म्हणाले, प्रत्येक तरुणाने वर्तन, विचार आणि कृतीने तरुण असले पाहिजे. तुमच्या विचारातून देशाचा इतिहास घडणार आहे. स्वप्न तरुण असली पाहिजेत. स्वागत व प्रास्ताविक सहा.प्राध्यापक डॉ.संजय चोपडे यांनी केले. पाहुण्याची ओळख सहा.प्राध्यापक डॉ.प्रकाश बेळीकट्टी यांनी करून दिली. सूत्रसंचालन सहा.प्राध्यापक डॉ. प्रवीण लोंढे यांनी केले तर सहा.प्राध्यापक डॉ.सचिन भोसले यांनी आभार मानले. यावेळी समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, आदी उपस्थित होते.